# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## शुध्दीपत्रक

**विषय :-** विद्यापीठ आस्थापनेतील 'विद्याशाखा अधिष्ठाता' या सांविधानिक पदाच्या जाहिरातीबाबत.

**संदर्भ :-**
१. जाहिरात क्र.२७, दिनांक १० नोव्हेंबर, २०२५
२. क्र.एएन/४३७३, दिनांक १२ डिसेंबर, २०२५
३. क्र.एएन/१८१, दिनांक १४ जानेवारी, २०२६

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आस्थापनेतील ''विद्याशाखा अधिष्ठाता'' या सांविधानिक पदांच्या भरतीकरिता जाहिरात क्र.२७, दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ रोजी विविध वर्तमानपत्रांमध्ये आणि विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर भरतीविषयक प्रक्रिया शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१, दि.०६ ऑक्टोबर, २०२५ अन्वये सुरु करण्यात आलेली होती. तद्नंतर दिनांक ११ फेब्रुवारी, २०२६ रोजी निर्गमित झालेल्या महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०२५/ई-८६०४२१/विशि-१, दि.११ फेब्रुवारी, २०२६ अन्वये पूर्वीच्या दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२५ रोजी निर्गमित झालेल्या अनुषंगिक शासन निर्णयामध्ये विहित केलेली कार्यपध्दती रद्द करण्यात आलेली असून ती सुधारित कार्यपध्दती विहित करण्यात आलेली आहे.

या अनुषंगाने सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, वरील नमूद जाहिरात क्र.२७, दिनांक १० नोव्हेंबर, २०२५ ला अनुसरुन ज्या उमेदवारांनी विहित मुदतीत अर्ज सादर केलेले आहेत, अशा सर्व उमेदवारांनी त्यांच्या अर्जामध्ये ऑनलाईन पध्दतीने बदल/सुधारणा कराव्यात व A.T.R. (Academic Teaching Research) बाबतची माहिती अद्ययावत करावी. तसेच ज्या उमेदवारांनी यापूर्वी सदर पदाकरिता अर्ज केला नसेल, अशा इच्छुक उमेदवारांनी विहित प्रक्रियेनुसार नव्याने अर्ज सादर करावेत.

ऑनलाईन पध्दतीने सुधारित अर्ज सादर करण्याची व A.T.R. (Academic Teaching Research) विषयक माहिती अद्ययावत करण्याची तसेच ऑनलाईन पध्दतीने नव्याने अर्ज सादर करण्याची मुदत **गुरुवार, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२६ ते गुरुवार, दिनांक १२ मार्च, २०२६** पर्यंत राहील. सुधारित अर्जांची छापील प्रत (Hard Copy) व नव्याने केलेल्या ऑनलाईन अर्जांची छापील प्रत (Hard Copy) संबंधित कागदपत्रांसह सादर करण्याची अंतिम मुदत **बुधवार, दिनांक १८ मार्च, २०२६** पर्यंत राहील.

उपरोक्त संदर्भीत जाहिरात क्र.२७, दि.१० नोव्हेंबर, २०२५ विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(सीएमए डॉ. चारुशीला गायके)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे-४११ ००७.
जावक क्र.एएन/ 655
दिनांक : 25 FEB 2026